अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ नुसार जिल्हा परिषदांतर्गत गट-क व गट -ड मधील पदावर शारीरिकदृष्ट्या अपंगांसाठी केंद्र शासनाने अपंगाच्या पद निश्चिती बाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, अपंग -२०१०/प्रक्र २५०/आस्था-९,
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक : १४ जानेवारी, २०११.

**वाचा** :- १) अपंगव्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम -१९९५ (१९९६चा - १ )
२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही १०९८/प्र १२/१६-अ दि.२.५.१९९८,
३) शासन निर्णय, ग्रा.वि व ज.सं.वि.क्र.अपंग-१०९८/प्र.क्र. २०४६/ आस्था-९, दि.६ जानेवारी,२००४.
४) शासन निर्णय, ग्रा.वि व ज.सं.वि.क्र.अपंग-२००७/प्र.क्र. ५२१/ आस्था-९,दि.२ जुलै,२००८
५) शासन निर्णय, ग्रा.वि व ज.सं.वि.क्र, अपंग -२००७/प्रक्र ५२१/आस्था-९,दि. ३१ मार्च, २००९
६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक न्यायाप्र-२००९/प्र.क्र.५/सुधार-३, दि. ३ ऑगस्ट,२०१०.
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - संकीर्ण-१०१०/प्र.क्र.८९०/१९, दि.१० जानेवारी,२०११.

**प्रस्तावना** :- अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम, १९९५ ( १९९६ चा -१ ) हा अधिनियम दि.७ फेब्रुवारी, १९९६ पासून लागू झाला आहे. या कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३ टक्के पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार या विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषदेच्या सेवेतील गट- क व गट-ड मधील पदावर शारीरिकदृष्टया अपंगासाठी आरक्षण ठेवण्याकरीता संदर्भ क्रमांक-४ व ५ येथील दिनांक २ जुलै,२००८ व दिनांक ३१ मार्च, २००९ च्या शासन निर्णयानुसार पदनिश्चिती करण्यात आली आहे.

२. शासनाच्या विविध विभागामार्फत अपंगासाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या पदनिश्चितीमध्ये एकवाक्यता नाही किंवा ती परिपूर्ण नाही, यासाठी अपंग व्यक्तीसाठी सुधारीत पद निश्चिती करणे व त्यानुषंगाने अपंगाची राखीव पदे भरणे या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक- २२५/२००९ दाखल करण्यात आली आहे. या याचिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगासाठी सुनिश्चित करणे बाबतचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन संदर्भ क्रमांक -६ येथील दिनांक ३ ऑगस्ट,२०१० च्या शासन निर्णयान्वये सूचित केल्याप्रमाणे या विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषदांच्या सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच अपंगांच्या पद निश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार अपंगांसाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय**

मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक २२५/२००९ संदर्भात शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगासाठी सुनिश्चित करण्याबाबतचे निदेश दिले असल्याने उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ व ५ येथील दिनांक २ जुलै,२००८ व दिनांक ३१ मार्च,२००९ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२. अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम, १९९५ ( १९९६ चा -१ ) हा अधिनियम दि.७ फेब्रुवारी, १९९६ पासून लागू झाला आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्रमांक-२ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २ मे,१९९८ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत अंध वा अशंत: अंध, कर्णबधीर, चलनवलन विकलांगता किंवा मेंदुचा आजार या व्याधीने ग्रस्त झालेल्या व्यक्तींसाठी सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवण्याच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्रमांक -६ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३ ऑगस्ट,२०१० नुसार शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगासाठी सुनिश्चित करणेबाबतचे निदेश दिले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदांतर्गत "क" व "ड " या गटात अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम, १९९५ च्या तरतूदीनुसार केंद्र शासनाच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या आणि जिल्हा परिषदेंतर्गत समान पदावर कार्यरत असलेल्या पदांसाठी सरळसेवा भरतीबाबत आरक्षण ठेवण्याबाबत संदर्भ क्रमांक ६ येथील दिनांक ३ ऑगस्ट,२०१० च्या शासन निर्णयानुसार सुचित केल्याप्रमाणे जिल्हा परिषदांमधील "क" व "ड" गटातील कोणत्या पदासाठी कोणत्या वर्गवारीतील अपंग व्यक्तींसाठी आरक्षण ठेवावे याबाबत शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

(१) अपंग व्यक्ती ( समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम, १९९५ ( १९९६ चा -१ ) या अधिनियमातील कलम ३२ व ३३ नुसार या विभागाच्या अखत्यारी खालील जिल्हा परिषदांतर्गत गट "क" व "ड" मधील विविध संवर्गातील पदांवर अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असलेल्या अपंग व्यक्तींना ३ टक्के पर्यंत सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवण्यात यावे.

(२) संबंधीतांकडून उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यावर अशा उमेदवारांस शारीरिक पात्रतेसंदर्भात विहित केलेल्या वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केल्यानंतरच अशा अपंग व्यक्तींची जिल्हा परिषदांतर्गत गट "क" व "ड" मधील पदांवर नियुक्ती करण्यात यावी. या शिवाय खालील निकषानुसार अशा अपंग व्यक्तींची सरळसेवा भरतीने नियुक्ती करण्यात यावी :-

अ) संबंधीत सेवाप्रवेश नियमाच्या तरतूदीनुसार अर्हता आवश्यक असेल,

ब) त्या त्या संवर्गातील पदाची कर्तव्ये व जबाबदा-या लक्षात घेवून त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने सक्षम ठरविल्यास ,

क) जिल्हा परिषदेंतर्गत गट "क" व "ड" मधील विविध संवर्गात सोबतच्या परिशिष्ट -अ मध्ये दर्शविल्यानुसार अपंगत्वाच्या प्रत्येक प्रकारास प्रत्येकी १ टक्का या प्रमाणे एकूण ३ टक्के पर्यंत सरळसेवा भरतीने आरक्षण ठेवून नियुक्ती करण्यात यावी.

(३) गट"क" व "ड" मधील पदांच्या पदोन्नतीच्या पदास अपंगाचे आरक्षण लागू राहील.

३. वाहन चालक या पदास अपंग प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यापासून सुट देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या उपरोक्त संदर्भ क्रमांक -७ येथील दिनांक १०/०१/२०११ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला धोरणात्मक निर्णय जिल्हा परिषदांना जसाच्या तसा लागू राहील.

४. हे आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्रमांक ६ येथील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे..

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२०११०११४१८१७०७००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( प्रकाश हिर्लेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
निबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
निबंधक, उच्च न्यायालय,(अपीलेट साईड ) मुंबई,
प्रापोनेटरी ॲन्ड सिनियर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई,
महालेखापाल - १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) मुंबई,
महालेखापाल -२ ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
सेवायोजन संचालनालय, मुंबई,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, (३ प्रती )
कृषि , पशुसंवर्धन , दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
प्रधान सचिव,ग्राम विकास यांचे स्वीय सहाय्यक,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
कार्यासन अधिकारी, का.क्र.आस्था-२, आस्था-३, आस्था-४, आस्था-७, आस्था-८, आस्था-१०, आस्था-११,आस्था-१२,योजना-४
निवड नस्ती का.क्र.आस्था-९, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

**परिशिष्ट- अ**

ग्राम विकास व जलसंधारण विभागांतर्गत गट- "क" व "ड" मध्ये सरळसेवा भरतीचे नियुक्ती करण्यासाठी केंद्र शासनाच्या निकषांच्या धर्तीवर अपंग व्यक्तीसाठी शारीरिक पात्रतेचे सुधारित निकष.

**(केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार)**

शासन निर्णय क्रमांक अपंग -२०१०/प्रक्र २५०/आस्था-९ दिनांक १४-१-२०११ चे सहपत्र

| अ.क्र. | पदनाम | पद सुनिश्चीतीसाठी अपंगत्वाचे निकष |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहाय्यक | BL,OL,B, LV,HH |
| २ | वरिष्ठ सहाय्यक | OA, OL,BL,OAL,B, LV,HH |
| ३ | वरिष्ठ सहाय्यक (सांख्यिकी ) | OL,BL,B,LV, HH |
| ४ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | OL,BL,B,LV, HH |
| ५ | लघुलेखक उच्च श्रेणी | OA, OL,BL,OAL,B, LV,HH |
| ६ | लघुलेखक निम्न श्रेणी | OA, OL,BL,OAL,B, LV,HH |
| ७ | लघुटंकलेखक | OA, OL,BL,OAL,B, LV |
| ८ | टंकलेखक | OA, OL,BL,OAL,B, LV,HH |
| ९ | कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक | B, LV,HH,OL,OA |
| १० | मुख्याध्यापक | B, LV,HH,OL,OA |
| ११ | उपमुख्याध्यापक | B, LV,HH,OL,OA |
| १२ | माध्यमिक शिक्षक | B, LV,HH,OL,OA |
| १३ | प्राथमिक शिक्षक | B, LV,HH,OL,OA |
| १४ | प्रयोग शाळा सहाय्यक | OA,OL,BL,HH |
| १५ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | B, LV,HH,OL,OA |
| १६ | शारीरिक शिक्षक | OL,LV,HH |
| १७ | चित्रकला शिक्षक | OA,OL,OAL,Bl, HH |
| १८ | हस्तकला शिक्षक | OL,BL,HH |
| १९ | विस्तार अधिकारी (पंचायत) | OL,LV,HH |
| २० | ग्रामसेवक | OL,LV,HH |
| २१ | कृषि अधिकारी | OL,LV,HH |
| २२ | विस्तार अधिकारी (कृषि) | OL,LV,HH |
| २३ | पशुधन पर्यवेक्षक | HH |
| २४ | वरिष्ठ समाजकल्याण सहाय्यक / समाजकल्याण सहाय्यक | OA,OL,BL,B,LV,HH |
| २५ | कनिष्ठ लेखाधिकारी | OA,OL,OAL,BL,HH |
| २६ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | OA,OL,OAL,BL,HH |
| २७ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | OA,OL,OAL,BL,HH |
| २८ | आरोग्य सेवक (पुरुष) | OL |
| २९ | आरोग्य सेवक (महिला) | OL |

| | | |
|---|---|---|
| ३० | आरोग्य पर्यवेक्षक | OL |
| ३१ | औषध निर्माता | OL,BL |
| ३२ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | OA,OL |
| ३३ | पर्यवेक्षिका | OL,BL,OA,B,LV,HH |
| ३४ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | OL,OA,HH |
| ३५ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | OL,OA,HH |
| ३६ | वरिष्ठ यांत्रिकी | OL,LV,HH |
| ३७ | कनिष्ठ यांत्रिकी | OL,LV,HH |
| ३८ | जोडारी | OL,HH |
| ३९ | आरेखक | OL,HH |
| ४० | कनिष्ठ आरेखक | OL,HH |
| ४१ | अनुरेखक | OA,OL,BL,LV,HH |
| ४२ | संगणक | OA,OL,OAL,BL,B,LV,HH |
| ४३ | तारतंत्री | OL,HH |
| ४४ | कलाकार-नि- छाया चित्रकार | OL,BL,HH |
| ४५ | आयुर्वेदिक वैद्य | OA,OH |
| ४६ | युनानी हकीम / तबीब | OA,OH |
| ४७ | व्रणोपचारक | OL,HH |
| ४८ | परिचर | OA,OL,HH,LV,B |
| ४९ | सफाई कामगार | OL,OA,HH,LV |

ABREVATIONS USED :-

| | |
|---|---|
| OH- Orthopaedically Handicapped | OAL- One Arm and one Leg |
| BLA- Both legs & Arms | BL- Both Legs |
| OL- One Leg | B- Blind |
| BA- Both Arms | LV- Low Vision |
| OA- One Arm | HH- Hearing Handicapped |